Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-2 | Aug-2014
Available online at www.lbp.world

मराठी ग्रामीण कवितेचे स्वरूप

डॉ. वामन जाधव
मराठी विभाग, सहयोगी प्राध्यापक,
मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब.

प्रस्तावना :

ज्या कवितेत ग्रामीण जीवनाचे चित्रण येते तिला ग्रामीण कविता म्हणता येईल. अशा ग्रामीण कवितेची सुरूवात मौखिक परंपरेत सापडते. परंतु जाणीवपूर्वक लेखन म्हणून १९२० च्या कालखंडात उल्लेख केला जातो. परंतु ग्रामीण जीवन चित्रणाच्या दृष्टीने १९२० पूर्वीची कविता ही महत्त्वाची अशी आहे. १८८७ काळात एक खेडे ही केशवसुताची कविता खेड्याचे चित्रण करते. ग्रामीण जीवनातील अनेक घटक या कवितेत आले आहे. शेतकऱ्याचे घर त्याची जनावरे कुटुंबातील नाते संबंध, नाते संबंधातील प्रेम याचे चित्रण केशवसुताच्या कवितेत आले आहे. शिवाय खेड्यातील महत्त्वाचा घटक म्हणजे पाऊस, पाऊस वेळेवर आला तर ग्रामीण जीवन समृद्ध असते. परंतु पावसाने ओढ दिली तर ग्रामीण जीवन विस्कळीत होते. अशा दुष्काळाचे चित्रण त्या काळात माधव ज्युलियननी केले आहे. ही कविता ग्रामीण जीवन चित्रणाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. दुष्काळामुळे हतबल झालेला शेतकरी दावणीतील गुरे विकताना त्याची होणारी मानसिक ओढातान कवीने उतमरित्या चित्रित केली आहे. याचकाळातील आणखी एक महत्त्वाचा कवी म्हणून कवी दत्ताच्या कवितेचा उल्लेख करता येईल. यांची ही कविता दुष्काळाचे चित्रण करते. कवी विठ्ठल भगवंत लेंभे आणि मोरो गणेश लोंढे याचेही ग्रामीण जीवन वरील काव्य महत्त्वाचे असे आहे. शेतकरी हा ग्रामीण जीवनाचा कणा आहे. तो शेती करताना त्याला कोणत्या अडचणी येतात सावकार व्याजाचे पैसे वाढवतो. त्यावेळी दावनीतील गुरेढोरे शेतकरी विकूण टाकतो. येवढ्यावरच त्याचे कर्ज फिटत नाही तर ते जमीनच शेतकऱ्याला विकावी लागते. आपल्या काळ्या आईला विकताना शेतकऱ्याची जी अवस्था होते त्याचे चित्रण उत्तमरित्या त्या कवितेत आले आहे. याच कालखंडात चंद्रशेखर यांचे काव्य ही लक्षणीय स्वरूपाचे आहे. चंद्रशेखर यांचे काय हो चमत्कार! हे खंडकाव्य महत्त्वाचे आहे. इंग्रजी लेखक मिल्टनच्या काव्याचे हे रूपांतर आहे. परंतु असे असली तरी ग्रामीण जीवनातील अनेक घटक या कवितेत शब्दबद्ध झाले आहेत. ते मराठीतील स्वतंत्र खंड काव्य आहे असे वाचताना वाटत राहते. खेड्यातील प्रेम कहानी यात शब्दबद्ध करण्यात आली आहे. परंतु खेड्यातील चालीरिती, रूढी परंपरा व वास्तव भाषेचा वापर त्यांनी केला आहे. त्यामुळे त्यातील ग्रामीण जीवन हे खरे वटते. भा. रा. तांबे यांचे ही काव्य लेखन ग्रामीण जीवनाशी निगडीत असे आहे. त्याचे गुराख्याचे गाणे ही कविता ग्रामीण जीवनाचे चित्रण करते. रम्य कल्पनेतून हे गुराख्याचे जीवन चित्रित झाले आहे. या काव्यात वास्तवतेचा अभाव आहे. तांबे यांच्या सौंदर्यवादी हक्कांचा प्रभाव त्या कवितेवर जाणवत राहतो. साधारणपणे १९२० पूर्वीचे मराठी ग्रामीण अशा स्वरूपाचे आहे.

जानपद कविता म्हणून ज्या कवितेचा आपण उल्लेख करतो, त्या अगोदरच्या काळात जे लेखन झाले आहे. ते रोमँटिक वृत्तीने झाले आहे. शिवाय त्यावर इंग्रजी काव्याचा प्रभावही जाणवतो. असे असले तरी ग्रामीण जीवन चित्रणाचा

त्यांनी केलेला प्रयोग हा महत्त्वाचा आहे. परंतु यापेक्षाही ग्रामीण जीवनाचे खरे वास्तव हे मौखिक साहित्यात पाहावयास मिळते. मराठी मौखिक साहित्यातील काव्य ग्रामीण जीवन चित्रणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असे आहे.

ग्रामीण जीवनातील सण-समारंभ, रूढी परंपरा, चालीरिती, श्रद्धा अंधश्रद्धा खेड्यातील नातेसंबंध मौखिक रूपात येथे मांडलेले आहेत.

नवरीचा बाप हिंडतो घरोघर ।
बिन हुंड्याचा नाही वर ।
बोलतो आपल्या राणी ।
कर्ज काढतो शेतावर।।

लग्न हा खेड्यातील महत्त्वाचा विधी असतो. त्यातही मुलीच्या लग्नाची बापाला काळजी लागून राहिलेली असते. हुंडा देणे घेणे हा खेड्यात अलिखित नियम असतो. दुष्काळाने शेतीची झालेली वाताहात नापिक शेती झालेली असते. अशा प्रसंगी कर्ज काढून मुलीचे लग्न केल्याशिवाय गत्यंतर नसते. खेड्यातील अशा महत्त्वाच्या प्रश्नावर अशा काव्यातून प्रकाश पडला आहे. शिवाय खेड्यातील नातेसंबंधाना अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यातही भाऊ-बहिण अशी नाती खूप पवित्र मानली जातात. अशा नात्यासंबंधावर अलिखित काव्यातून प्रकाश पडला आहे.

चोळ्यांवरी चोळ्या । वतन माझी वाकली ।।
बहिण भावाला एकली । माझ्या वलनी देते गाठी ।।
हावश्या माझा बंधू । दर महिन्याला येतो चारी ।।
चोळ्यावरी चोळ्या । माझ्या वलनी आलापूर ।।
बंधुला सांगते । नवा निघाला मोतीचूर ।।

अशा मौखिक काव्यातून ग्रामीण जीवनातील नातेसंबंध अधोरेखित झाला आहे.

मराठी ग्रामीण काव्याची ही परंपरा संत साहित्यातही पाहावयास मिळते. संतांचे काव्य हे ग्रामीण काव्य आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत रामदास, संत सावतामाळी, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत कवयित्री जनाबाई, मुक्ताबाई अशा अनेक संतांच्या काव्यातून ग्रामीण जीवन आले आहे. संतांचे वास्तव्य हे खेड्यात असल्याने खेड्याचे अनेक संदर्भ त्याच्या काव्यात आले आहे. शिवाय खेड्यातील दुष्काळ निवारण, पर्यावरण, वनीकरण अशा अनके महत्त्वपूर्ण घटकांवर संतानी आपल्या काव्यात प्रकाश टाकला आहे. त्यामुळे संत तुकारामाचे काव्य सर्व अर्थाने महत्त्वाचे आहे. संत तुकारामांनी शेती-शेतकरी या संदर्भात महत्त्वाचे लेखन केले आहे. दुष्काळावर मात कशी करावी. पाण्याचे नियोजन कसे करावे. पिकाचे राखण कसे महत्त्वाचे आहे. शेतीची मशागत कशी करावी, बियाणे कशी असावीत असे एक ना अनेक गोष्टीवर त्यांनी भाष्य केले आहे. ग्रामीण जीवन चित्रणाच्या दृष्टीने त्याचे काव्य खूपच मोलाचे आहे.

कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी अशी काव्याची रचना करणारे संत सावतामाळी यांचे सगळे काव्य हे शेतीच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. मुक्ताबाई, जनाबाई, आऊबाई, लिंबाई, सोयराबाई, निर्मला भागू, कान्होपात्रा अशा कितीतरी संत कवयित्रीच्या कविता या ग्रामजीवनाशी निगडीत आहेत. संत कवयित्रीच्या अभंगातून भक्ती भावनेचा आविष्कार व्यक्त झाला असला तरी ग्रामजीवनाचे अनेक संदर्भ त्यात सहजपणे आले आहेत.

जनी जाय शेणासाठी । उभा आहे तिच्या पाठी ।।
पितांबराची कांस खोवी । मग चाले जनाबाई ।।
गौऱ्या वेचुनि बांधिली गोट। जनी म्हणे द्यावी गोठ।।
मोट उचलून डोई घेई । मागे चाले जनाबाई ।।

या अभंगातून येणारी शब्द कळा ही ग्रामीण जीवनात राजरोसपणे येणारी आहे. शेण, कांस, गौऱ्या, मोट डोई, अशी ही अभंग रचना ही ग्रामीण काव्य वाटते. सोयराबाईचा अभंग ही ग्रामीण काव्याचा दृष्टीने महत्त्वाचा आहे.

सोयरा म्हणे पती । मनी आली बाईची रवंती ।।
चोखा सोयरा कर्ममेळा । भेदू आले त्या निर्मळा ।।
झाली निर्मळेचा भेटी । सोयरा पायी घाली मिठी ।।
धन्य बाई मेहुणा परी । म्हणे चोख्याची महारी ।।

अशा अभंगातून ग्रामीण जीवनातील नातेसंबंध आला आहे. ग्रामीण जीवनात नाते संबंधाला खूप महत्त्व असते. नात्यातला आदर राखला जातो. नेमके तेच या अभंगात आले आहे. संत कवयित्रीने याही अभंगात विठ्ठलाशी जवळीक साधलेली असली तरी त्यातून ग्रामीण जीवनाचा ही आविष्कार व्यक्त झाला आहे.

१९२० व त्यापूर्वीचा कालखंड मराठी ग्रामीण कवितेचा लेखन कालखंड मानला तरी त्यापूर्वीचे मौखिकपर संतांचे कार्य यात महत्त्वाचे आहे. त्यातही महात्मा फुले यांचे काव्य ग्रामीण जीवन चित्रणाच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचे आहे. महात्मा फुले यांनी आपल्या काव्यातून केवळ खेडेपाडे चित्रण केले नाही तर आपल्या काव्यातून ग्रामीण जीवनाचे शोषण कसे होते त्यावर उपाय काय? हे सांगितले आहेत. महात्मा फुले यांच्या काव्याच्या मुळाशी वैचारिक अधिष्ठान आहे. त्यांची कविता ही खऱ्या अर्थाने ग्रामीण कविता आहे.

१९२० नंतरचा कालखंड ग्रामीण कवितेला महत्त्वाचा कालखंड मानली जातो. सुगी हा जानपद गीतसंग्रह प्रसिद्ध झाला. पस्तीस कवींचा समावेश असलेला हा कवितासंग्रह ग. ल. ठोकळ यांनी प्रसिद्ध केला. कवी गिरीश, यशवंतांची कविता याच कालखंडात प्रसिद्ध झाली. पा. श्रा. गोरे, बी. रघुनाथ, ग. ह. पाटील आणि ग. ल. ठोकळ यांनी शेती व शेतकऱ्याच्या जीवनावर लेखन केले आहे.

धन्याला बाई रोज–मजुरी आणेबारा संसार त्यात सारा।
पोराला पालू माझ्या–बांधतो आवळून पेटते जरी रान ।
दुःख न माझे मला–उपाशी परी बाळे आंतरी कळवळा ।

ग्रामीण जीवनातील दैन्य दारिद्र्य या कवितेतून व्यक्त होत आहे. सोपानदेव चौधरी यांचे ही लेखन ग्रामीण जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

१९६० पासून मराठी ग्रामीण कवितेमध्ये ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्र येवू लागले. आनंद यादव, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ यांचे हिरवे जग, रानातल्या कविता, प्रार्थना दया घना असे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले.

कच्ची बच्ची माझी पोरं ।
तरी मागनं ढकलती ।
उभा चढाव चढना ।
गाय वडती एकुलती ।
चिंतागती झाले तवा ।
लेका, तुझ्या बऱ्यासाठी ।

खेड्यातील स्त्रीचे दुःख ओढाताण या कवितेत आली आहे. तर महानोरांच्या कवितेत शेतीशी असणारे अतुट नाते स्पष्ट झाले आहे. कारण जीवनातले सुख दुःख हे शेतीशी बांधलेले असते. महानोरांचे व्यक्तिमत्त्व हे शेतीशी एकरूप झाले आहे.

ह्या शेताने लळा लाविला असा की ।
सुखदुःखा परस्परांशी हसलो–रडलो ।
आता तर हा जीवच अवघा असा जखडला ।

मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो ।।

विठ्ठल वाघ यांचे कविता लेखन ग्रामीण जीवन चित्रणाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. शेती व्यवसाय हा विठ्ठल वाघांच्या कवितेचा मूळ गाभा आहे. पिढ्यानं पिढ्या शेतकऱ्याचे होणारे शोषण त्यांची कविता धिटपणे मांडले. शेतकरी जीवनाचा वेध घेण्यास त्यांची कविता यशस्वी झाली आहे.

फुलल्या कापसाले चंद्र चोरू चोरू पाहे ।
तरी माय माउलीची मांडी उघडीच राहे ।

अशी खंत ते व्यक्त करतात. माधव थोरात (आपुन तर मानसं हाय), जगदीश देवपूरकर (गावाकडची कविता), नारायण कुलकर्णी–कवठेकर (हे माझ्या गवताच्या पात्या), उत्तम कोळगांवकर (जंगल झडी), नारायण सुमंत (सातबारा), राजन गवस (हुंदका), फ. म. शहाजिंदे (शेतकरी), शंकर बडे (दूरवा), इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, प्रदीप पाटील, प्रकाश घोडके, प्रकाश होळकर या कवींचे ग्रामीण जीवनावरील लेखन लक्षणीय असे आहे. कल्पना दुधाळ यांची 'सिझर कर म्हणतेय माती' व 'धग असतेच आसपास' या कवितासंग्रहातून ग्रामीण स्त्रीचें संवेदनशील मन व्यक्त झाले आहे. पिढीपेस्तर प्यादेमात हा संतोष पद्माकर पवार यांच्या कवितेतून उद्ध्वस्त होत चाललेल्या खेड्याचे चित्रण आले आहे. तर श्रीकांत देशमुख यांच्या बळिवंत, बोलावे ते आम्ही या कवितासंग्रहातून शेती व शेतकऱ्याचे प्रश्न अधोरेखित झाले आहेत.

मराठी ग्रामीण कवितेची सुरूवात मौखिक काव्यात सापडते. श्रम हलके व्हावे म्हणून मनोरंजनाच्या हेतूने निर्माण झालेल्या काव्यात ग्रामीण माणसाचे सुखदुःख पाहावयास मिळते. संतांच्या काळात ग्रामीण जीवनाचे अनेक बारकावे पाहावयास मिळतात. संत सावतामाळी, संत तुकाराम यांच्या काव्यामध्ये शेती व शेतकऱ्याचे चित्रण वाचकाला अस्वस्थ करते. संत जनाबाई, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा अशा संत कवयित्रींच्या काव्यातून ग्रामीण स्त्री मनाचा आविष्कार पाहावयास मिळतो. महात्मा फुले यांचे काव्य मराठी ग्रामीण कवितेला मार्गदर्शन ठरणारे आहे. मराठी ग्रामीण कवितेला वैचारिक अधिष्ठान फुले यांच्या कवितेने प्राप्त करून दिले. सर्वच पातळीवर म. फुले यांची कविता समृद्ध आहे. १९४० पूर्वीची कविता जिला जानपद कविता असे म्हटले जाते. ही कविता खेड्याचे चित्रण करते परंतु इंग्रजी काव्याच्या संस्कारातून ती कविता येते. खेड्यातील दैन्य, दारिद्र्य या कवितेत येताना दिसत नाही. सहानुभूतीस लिहिलेली कविता खेड्याचे कल्पनेतून चित्रण करते. १९२० हा कालखंड मराठी ग्रामीण कवितेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. म.गांधीनी खेड्याकडे चला अशी हाक दिली. साहित्यिक विचारवंत ही मंडळी खेड्याकडे आली. त्यानी नद्यावरून शेतीशिवार पाहिले आणि काव्याचा निर्मिती केली. खेड्यातील नायक–नायिका, यांचा प्रणय, रसरसीत निसर्ग व बोली भाषेच्या जवळ जाणारी भाषा अशा माध्यमातून त्यानी कविता लेखन केले. परंतु खऱ्या अर्थाने मराठी ग्रामीण कविता १९४५ च्या दरम्यान येऊ लागली. दुसरे महायुद्ध घडले. त्यातनूच माणूसपणावरचा विश्वास उडाला. त्यातच शेतीत राबणारी मुल शाळेत येऊ लागली. आपला अनुभव काव्यात यावा असे त्यांना वाटू लागले. त्यातूनच काव्याची निर्मिती होऊ लागले. मातीत राबणारे माय–बाप आपली भावंडे, निसर्गाची विविधरूपे एकूणच गावगाड्यातील चित्रण मराठी ग्रामीण काव्यात येऊ लागले.

१९८० नंतरची मराठी ग्रामीण कविता खूप महत्त्वाची मानली जाऊ लागली. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर आलेली कविता केवळ शेतीशिवाराचे वर्णन करीत नाही. तर गावगाड्यात अवकळा का आली याची कारणमीमांसा करू लागली. बदलते ऋतूमान, बाजारपेठेतील अस्थिर भाव सरकारचे चुकीचे धोरण शेतकऱ्याच्या कामाला प्रतिष्ठा नसणे. याचा जाब कविता विचारू लागली. महात्मा फुले यांच्या विचार कवितेच्या केंद्रासाठी येऊ लागला. विद्रोहाच्या अंगाने येणारी कविता सर्वच क्षेत्रातील शोषणाच्या विरोधात बोलू लागली. आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने ती समृद्ध होताना दिसते.

संदर्भ

१) मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, कैलास सार्वेकर, मेहता पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९.
२) संत परंपरा आणि कृषी संस्कृती, वामन जाधव, हर्मिस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९१८.